अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४

**संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९** **ई-मेल :-** pemetansk@gmail.com

**जा. क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/ ११३ /२०२४ **दि. ०४/१०/२०२४**

# परिपत्रक

**विषय:-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्ग व्यावसायिक परीक्षा दि. २ व ३ सप्टेंबर २०२४.
**(केवळ पदोन्नती प्रक्रिया सुरु असलेल्या परीक्षार्थीच्या निकालाबाबत पर्याय)**

**संदर्भ:-**
१) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण क्र. ११७/२०२४ दि. ११/०७/२०२४
२) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण क्र. ११८/२०२४ दि. ११/०७/२०२४
३) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४
४) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ९९ दि. ०६/०९/२०२४
५) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. १०४ दि. १३/०९/२०२४.
६) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. १११ दि. २६/०९/२०२४.
७) श्री. मयूर विठ्ठल पवार, सहा. अभियंता श्रेणी-२, सां. बा. विभाग, अचलपूर (जि. अमरावती) यांचा दि. ०३/१०/२०२४ चा विनंती अर्ज

संदर्भ क्र. ३ अन्वयेच्या परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात आलेली, सहाय्यक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता (गट-ब संवर्ग) यांची व्यावसायीक परीक्षा, दि. ०२ व ०३ सप्टेंबर २०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. सदर परीक्षेची सर्व प्रक्रिया प्रथमच पुर्णपणे ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आल्याने परीक्षार्थीनी ऑनलाईन पद्धतीने सादर केलेले कागदपत्र व निकाल तपासणीचे परिक्षोत्तर काम या कार्यालमार्फत प्रगतीत आहे. मात्र परीक्षार्थीची मोठी संख्या (४६६५) विचारात घेता सदर कामासाठी अजुन काही कालावधी लागणार आहे.

दरम्यानच्या काळात, ब-याच परीक्षार्थीकडून त्यांच्या पदोन्नती प्रक्रियेसाठी अंतिम निकाल लवकरात लवकर जाहीर करणेसाठी या कार्यालयास सतत विनंती व पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्र. ७ अन्वये याबाबतचा अर्ज देखील या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. व्यावसायीक परीक्षेच्या निकालाभावी पदोन्नतीवर परीणाम होण्याची शक्यता ही वर्तविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. १ व २ राजपत्रातील सुधारीत परीक्षा नियमानुसार, ***"परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या लगतनंतरचा दिवस परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक मानण्यात येईल"*** असे नमुद असल्याने व्यावसायीक परीक्षेचा निकाल काही कालावधीने लागला तरी परीक्षा उत्तीर्ण होण्याचा दिनांक ४ सप्टेंबर २०२४ हाच राहील. दि. ४ सप्टेंबर २०२४ ते प्रत्यक्ष निकाल लागण्याच्या दिनांक या कालावधीत पदोन्नतीची प्रक्रिया होत असेल तर केवळ निकाला अभावी पदोन्नतीच्या प्रक्रियेतून वगळण्यात येणा-या परीक्षार्थ्याचे नुकसान होऊ नये या करीता खालील प्रमाणे पर्याय सुचविण्यात येत आहे.

१) या विषयी कृपया संदर्भ क्र. ५ व ६ च्या प्रबोधिनीच्या परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. ज्यायोगे परीक्षार्थ्याची परीक्षेसाठीची पात्रता व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे तपासण्याचे नियंत्रक अधिका-यांना सुचित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे नियंत्रक अधिकारी यांनी आवश्यक ती तपासणी करावी.

२) संदर्भ क्र. ४ अन्वये परीक्षार्थीना उत्तरपत्रिका (Answer Key) व परीक्षा दिलेल्या विषयाचे गुण अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सदर उत्तरपत्रिकेनुसार प्रत्येक परीक्षार्थीस प्राप्त झालेले गुण दिसत आहेत.

३) क्र. १ नुसार केलेली तपासणी व विषयातील मिळालेले गुण यानुसार परीक्षार्थी, परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे दिसत असेल तर, पदोन्नतीच्या संधीपासून परीक्षार्थी वंचित राहू नये यासाठी त्यांना उपलब्ध करून दिलेल्या उत्तरपत्रिकांचे प्रथम पान/पाने, त्यांचे स्वसाक्षांकीत (Self Attested) प्रत घेऊन, खालील शपथपत्रासह त्यास पदोन्नतीच्या प्रकियेसाठी ग्राह्य धरता येऊ शकेल.

*"मी, सदर परीक्षेतील दिलेली/दिलेल्या उत्तरपत्रिका (Answer Key) व मिळालेले गुण यांची सादर केलेली माहिती बरोबर असून, माहिती खोटी आढळल्यास किंवा प्रबोधिनीमार्फत जाहिर होणा-या परीक्षेच्या अंतिम निकालानुसार, माझ्या निकालात काही बदल झाल्यास, सदर माहितीच्या आधारे मला मिळालेली पदोन्नतीची संधी रद्द करणेस किंवा पदोन्नती प्रक्रियेतून माझे नांव वगळण्यास माझी काहीही हरकत नसेल व मला ते मान्य असेल."*

***प्रबोधिनी मार्फत उपरोक्त १ ते ३ प्रमाणे सुचविण्यात आलेल्या पर्यायाबाबत अंतीम निर्णय, मात्र संबंधीत नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावा***, अशी विनंती आहे.

सोबत:- संदर्भ क्र १, २, ५ व ६ ची प्रत

**(प्र. मो. बावीस्कर)**
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

4/10/24

प्रत- मास्टर फाईल २०२४

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ६४(३)] गुरुवार, जुलै ११, २०२४/आषाढ २०, शके १९४६ [पृष्ठे १४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ११७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### जलसंपदा विभाग

मंत्रालय,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जुलै २०२४.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक परीक्षा-२०२३/(प्र.क्र.२२/२०२३)/आ(प्रशि).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, काढलेले आदेश किंवा संलेख हे जेथवर महाराष्ट्र शासनाच्या, जलसंपदा विभागाच्या अंतर्गत सहायक अभियंता (स्थापत्य), सहायक अभियंता (यांत्रिकी) व सहायक अभियंता (विद्युत) श्रेणी- २ महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट - ब (राजपत्रित) पदांशी संबंधित असतील तेथवर, त्यांचे अंशतः अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, जलसंपदा विभागाच्या अंतर्गत सहायक अभियंता (स्थापत्य), सहायक अभियंता (यांत्रिकी) आणि सहायक अभियंता (विद्युत), महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, श्रेणी - २ या पदांचे विनियमन करणारे पुढील विभागीय परीक्षा (कायम करण्यासाठी) नियम करीत आहेतः-

**१.** या नियमांस, जलसंपदा विभागातील, सहायक अभियंता, विभागीय परीक्षा (कायम करण्यासाठी) नियम, २०२४, असे म्हणावे.

**२.** व्याख्या.– या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) “प्रबोधिनी” याचा अर्थ, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक, असा आहे;

(ख) “परिशिष्ट” याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेले परिशिष्ट, असा आहे;

(ग) “सहायक अभियंता” याचा अर्थ, जलसंपदा विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा, गट-ब (राजपत्रित) मधील सहायक अभियंता (स्थापत्य), श्रेणी - २ सहायक अभियंता (यांत्रिकी), श्रेणी - २ किंवा यथास्थिति, सहायक अभियंता (विद्युत), श्रेणी - २ पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे;

(घ) "परीक्षा" याचा अर्थ, या नियमांनुसार आणि नियम ७ तसेच परिशिष्ट क व परिशिष्ट ख अन्वये विहित केलेल्या पाठ्यक्रमानुसार घेतलेली सहायक अभियंता पदाकरिता असलेली विभागीय परीक्षा, असा आहे;

(ङ) "जलसंपदा विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग, असा आहे.

**३. परीक्षा देण्याकरिता अर्हता.**- सहायक अभियंता या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, परीक्षा देण्यास पात्र असेल.

४. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी.- (१) सहायक अभियंता पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तींना त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधीत किंवा यथास्थिति, वाढविलेल्या परिवीक्षा कालावधीत उक्त परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

(२) जर सहायक अभियंता पदावर व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास, आणि या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकास तो परिवीक्षाधीन असेल तर, या नियमांन्वये घेतलेली परीक्षा उत्तीर्ण करणे त्यास आवश्यक असेलः

परंतु, अशा प्रकारची व्यक्ती, या नियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी अगोदरच उक्त पदावर कायम करण्यात आली असेल तर, उक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यातून तिला सूट देण्यात येईल.

५. विहित कालावधीत परीक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम.- जर व्यक्तीने परिवीक्षाधीन कालावधीत परीक्षा उत्तीर्ण न केल्यास ती सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

६. उत्तीर्ण झाल्याचा दिनांक.- परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या लगतनंतरचा दिवस परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक मानण्यात येईल.

७. पाठ्यक्रम.- परीक्षेचा नमुना, पेपरची (प्रश्नपत्रिकांची) संख्या, विषय व मिळवावयाचे किमान पात्रता गुण परिशिष्ट "क" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि परीक्षेचा पाठ्यक्रम परिशिष्ट "ख" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल किंवा राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निदेश देईल त्याप्रमाणे असेल.

८. उत्तीर्ण होण्याचे मानक.- परीक्षा उत्तीर्ण होण्याचे मानक प्रत्येक पेपरमध्ये एकूण गुणांच्या पन्नास टक्के असेल. अनुत्तीर्ण झाल्यास, अशा उमेदवारांनी ज्या विषयांत तो अनुत्तीर्ण झाला आहे त्यासाठी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

९. विशेष प्राविण्य.- जो उमेदवार पहिल्या प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होतो आणि कोणत्याही विषयात सत्तर टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवतो, त्याने विशेष प्राविण्यासह परीक्षा उत्तीर्ण केल्याचे मानले जाईल आणि तशी नोंद त्याच्या सेवा पुस्तकात नोंदविली जाईल.

१०. परीक्षा केव्हा घेण्यात येईल.- (एक) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिकद्वारे वर्षातून एकदा, शक्यतो मे किंवा जून महिन्यात परीक्षा घेतली जाईल. परीक्षा इंग्रजी भाषेतून घेतली जाईल.

(दोन) प्रबोधिनी परीक्षा पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत परीक्षेचा निकाल जाहीर करेल. प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल अंतिम असेल आणि निकाल जाहीर करण्यास विलंब झाल्यास, परीक्षा अवैध ठरणार नाही.

११. परीक्षा कक्षातील वर्तन.- उमेदवार खालील नमूद केलेल्या पद्धतीने गैरवर्तन करीत असल्याचे आढळून आल्यास, परीक्षा नियंत्रण अधिकारी उमेदवाराला परीक्षेला बसण्यापासून रोखील आणि उमेदवाराला उर्वरित परीक्षेला बसण्यास मनाई करीलः-

(एक) कोणतेही कागदपत्रे, पुस्तक, मोबाईल, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण किंवा इतर कोणतीही सामग्री जी प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी संदर्भीत केली जाऊ शकते, त्याची नक्कल करणे, बाळगणे किंवा संदर्भ देणे;

(दोन) इतर उमेदवारांसोबत संभाषण करणे;

(तीन) कोणत्याही बाबतीत इतर उमेदवारांकडून मदत घेणे;

(चार) इतर कोणत्याही उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेची नक्कल करणे;

(पाच) उत्तर पत्रिका फाडणे;

(सहा) इतर कोणताही मार्ग किंवा वर्तनाची पद्धत जी परीक्षेत गैरप्रकार ठरू शकते.

१२. विभागीय परीक्षेसंदर्भातील सामायिक धोरण आणि सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी केलेले बदल यासंदर्भातील दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीचा शासन निर्णय क्र. विपधो २६२०/ प्र.क्र. १६/ का.१७ या नियमाला लागू असेल.

## परिशिष्ट क

## (नियम ७)

## जलसंपदा विभागातील सहायक अभियंता या पदासाठी विभागीय परीक्षेचे स्वरुप

| अ.क्र. | विषय | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | एकूण गुण | कालावधी | उत्तीर्णता गुण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत). | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १५० | ९० मिनिटे | ७५ |
| (२) | वैकल्पिक.- ((क) पासून (ङ) पर्यंत कोणताही एक विषय),-<br>(क) जलसंपदा बांधकामे व सिंचन व्यवस्थापन,<br>(ख) रस्ते, इमारती आणि पुलांचे बांधकाम,<br>(ग) पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियांत्रिकी,<br>(घ) यंत्रसामग्रीचा वापर,<br>(ङ) पारेषण व वितरण. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १५० | ९० मिनिटे | ७५ |
| (३) | लेखा व प्रशासन नियम. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| (४) | सर्वेक्षण. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| (५) | आरेखन. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| | **एकूण गुण** | | **६००** | | **३००** |

**परिशिष्ट ख**

**(नियम ७)**

**जलसंपदा विभागातील सहायक अभियंता या पदाकरिता विभागीय परीक्षेसाठी पाठ्यक्रम**

| **१. विषय - सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य/यांत्रिकी/ विद्युत)** | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **विषय** | **पाठ्यक्रम** |
| ( १) | सामान्य स्थापत्य अभियांत्रिकी | (एक)बांधकाम साधन सामुग्री,<br>(दोन) स्थापत्य बांधकामे, संकल्पन, गुण नियंत्रण,<br>(तीन) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(चार) आपत्ती व्यवस्थापन,<br>(पाच) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(सहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| ( २) | सामान्य यांत्रिकी अभियांत्रिकी | (एक) यांत्रिकीमध्ये वापरल्या जाणाऱ्या सामग्रीचे मूलभूत गुणधर्म, प्रमाण वजने आणि मापे,<br>(दोन) विविध यंत्रसामग्री आणि उपकरणांचा वापर,<br>(तीन) सांधकाम, डाककाम, झाळणकाम आणि तापन प्रक्रिया,<br>(चार) तेल इंजिन आणि दुरुस्ती व देखभाल,<br>(पाच) यंत्रसामुग्रीचे मुल्यांकन,<br>(सहा) वाणिज्यिक पत्रव्यवहार,<br>(सात) विद्युत जनित्रे व दुरुस्ती,<br>(आठ) कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३), श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८), भांडार शाखेशी निगडित नियम,<br>(नऊ) अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे,<br>(दहा) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(अकरा) आपत्ती व्यवस्थापन,<br>(बारा) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(तेरा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (३) | सामान्य विद्युत अभियांत्रिकी | (एक) महाराष्ट्र शासनाचे जलविद्युत धोरण,<br>(दोन) वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण,<br>(तीन) वीज निर्मिती केंद्र –संकल्पन, संरचना आणि देखभाल दुरुस्ती, |

| | | |
|---|---|---|
| | | (चार) विद्युत उपकेंद्र – संकल्पन, बांधकाम आणि देखभाल दुरुस्ती,<br>(पाच) विविध विद्युत उपकरणे – वापर, देखभाल आणि दुरुस्ती,<br>(सहा) घरगुती व औद्योगिक वापरात येणारी विविध उपकरणे,<br>(सात) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(आठ) आपत्ती व्यवस्थापन,<br>(नऊ) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(दहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| **२. विषय : वैकल्पिक** | | |
| (क) | जलसंपदा बांधकामे व सिंचन व्यवस्थापन | (एक) जलसंपदा विभागातील विविध बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) सिंचन व्यवस्थापन कायदे आणि नियम, जल लेखांकन, धरण सुरक्षा, राज्याची जलनिती,<br>(तीन) जलसंपदा विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ख) | रस्ते, इमारती व पुलांचे बांधकाम | (एक) सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ग) | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी | (एक) सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि पाणी पुरवठ्याशी संबंधित विविध बांधकामे आणि यंत्रांची देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) पाण्याचे संवातन, किलाटन, निस्यंदन, वितरण, पंप आणि पंपिंग केंद्र, जल निर्जंतुकीकरण, जल शुध्दीकरण केंद्राचे व्यवस्थापन,<br>(तीन) सांडपाणी विल्हेवाट प्रक्रियेशी संबंधित बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामुग्री, गुणनियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(चार) मलोपचार, मल व मल नि:स्त्राव यांची विल्हेवाट, मलव्यवस्थापन,<br>(पाच) पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कामांशी संबंधित वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |
| (घ) | यंत्रसामग्रीचा वापर | (एक) यांत्रिक कार्यशाळा - जागेची निवड, आराखडा, यंत्रसामग्री, कामाचे अंदाज, कारखाना नियम, भांडार व संग्रह, लेखा व पडताळणी, |

| | | |
|---|---|---|
| | | (दोन) मातीकामासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री - वापरानुसार निवड, उपयोगिता, देखभाल आणि दुरुस्ती, केलेल्या कामाचे परिव्ययांकन,<br>(तीन) मोटार वाहने - सामान्य प्रशासन, वापरानुसार निवड, उपयुक्तता, देखभाल व दुरुस्ती,<br>(चार) परिवहन नियम,<br>(पाच) विविध प्रकारचे रेल्वे इंजिन, त्यांची देखभाल दुरुस्ती,<br>(सहा) अचल सयंत्र व पंप यांचा वापर, देखभाल व दुरुस्ती,<br>(सात) कामकाजासंबंधित इतर उपकरणे आणि यंत्रसामग्री,<br>(आठ) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ङ) | पारेषण व वितरण | (एक) महाराष्ट्र शासनाचे जलविद्युत धोरण,<br>(दोन) २२किलो व्होल्ट, ११० किलो व्होल्ट व २२० किलो व्होल्ट , स्विचयार्ड संकल्पन, बांधकाम, कार्य व देखभाल दुरुस्ती,<br>(तीन) उपसा सिंचन योजना आणि पंप —संकल्पन, बांधकाम व देखभाल दुरुस्ती,<br>(चार) कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण,<br>(पाच) पारेषण व वितरण यांचे मुळ तत्व, नियम व प्रमाण व्होल्टेज<br>(सहा) पारेषण व वितरणासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य आणि सामग्री,<br>(सात) पारेषण व वितरण कामांचे संकल्पन, बांधकाम व देखभाल दुरुस्ती,<br>(आठ) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |

**३. विषय- लेखा व प्रशासन नियम**

| | |
|---|---|
| लेखा व प्रशासन नियम | (एक) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता,<br>(दोन) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका,<br>(तीन) भारत सरकारचे लेखा आणि लेखापरीक्षण नियम,<br>(चार) कामगार कायदे,<br>(पाच) महाराष्ट्र नागरी सेवा नियम,<br>(सहा) भांडार कामकाज, कोषागार नियम आणि इतर प्रशासकीय विभागांशी निगडित कामकाजाचे नियम,<br>(सात) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२),<br>(आठ) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ (२००६ चा महा.४),<br>(नऊ) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महा.२१), |

| | |
|---|---|
| | (दहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| **४. विषय - सर्वेक्षण** | |
| सर्वेक्षण | (एक) प्रकल्प सर्वेक्षण,<br>(दोन) सर्वेक्षणाची उपकरणे, सर्वेक्षणाची प्रगत उपकरणे, वापर व देखभाल,<br>(तीन) सर्वेक्षणाचे नियम व परिगणना,<br>(चार) सर्वेक्षणाबाबत वेळोवेळी काढलेले शासन निर्णय व परिपत्रके,<br>(पाच) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |
| **५. विषय - आरेखन** | |
| आरेखन | (एक) प्रकल्प आरेखन, रेखाचित्रांचे जतन,<br>(दोन) रेखाचित्राच्या विविध प्रचलित व अद्ययावत पद्धती,<br>(तीन) विविध संरचनांचे रेखाचित्र,<br>(चार) रेखाचित्राबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके,<br>(पाच) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**उद्धव दहिफळे**
शासनाचे उप सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 11th July 2024.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.Exam-2023/(C.R.22/2023)/E.(Trg.).- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in partial supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf, so far as they are related to the posts of Assistant Engineer (Civil), Assistant Engineer (Mechanical) and Assistant Engineer (Electrical) in the Maharashtra Engineering Services, Group B, under the Water Resources Department, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules for regulating the Departmental Examination (for confirmation) for the posts of Assistant Engineer (Civil), Assistant Engineer (Mechanical) and Assistant Engineer (Electrical), Grade-II in the Maharashtra Engineering Services, Group B, (Gazetted), under the Water Resources Department of the Government of Maharashtra, namely :–

**1.** These rules may be called the Assistant Engineer in the Water Resources Department, Departmental Examination (for confirmation) Rules, 2024.

**2.** *Definitions*.– In these rules, unless the context requires otherwise,–

(*a*) "Academy" means the Maharashtra Engineering Training Academy, Nashik;

(*b*) "Appendix" means an Appendix appended to these rules;

(*c*) "Assistant Engineer" means a person appointed by nomination on the posts of Assistant Engineer (Civil) Grade II, Assistant Engineer (Mechanical) Grade II or Assistant Engineer (Electrical), Grade-II as the case may be, in the Maharashtra Engineering Services, Group B (Gazetted) under the Water Resources Department;

(*d*) "Examination" means the Departmental Examination for the post of Assistant Engineer held in accordance with these rules and as per the syllabus prescribed under rule 7 read with Appendix A and Appendix B;

(*e*) "Water Resources Department" means the Water Resources Department of the Government of Maharashtra.

**3.** Eligibility to appear for Examination.– A person appointed to the post of Assistant Engineer shall be eligible to appear for the Examination.

**4.** Period for passing Examination.– (1) The persons appointed by nomination to the post of Assistant Engineer shall be required to pass the said Examination during their probationary period or extended probationary period, as the case may be.

(*2*) If the person is appointed, to the post of Assistant Engineer and is on probation on the date of publication of these rules, then he shall require to pass the Examination conducted under these rules:

Provided that, if such person is confirmed on the said post on or before the date of publication of these rules, then he shall be exempted from passing the said Examination.

**5.** Consequences of failure to pass Examination within prescribed period.– If the person fails to pass the Examination within the probation period, he shall liable to be terminated from service.

**6.** *Date of passing*.– The day immediately following the next day of the last paper of the Examination, shall be considered as the date of passing of the Examination.

**7.** *Syllabus*.– Pattern of Examination, number of papers, subjects and minimum qualifying marks to be obtained shall be as specified in Appendix "A" and syllabus of the examination shall be as specified in Appendix "B" or as the State Government may direct by order, from time to time.

**8.** *Standard of passing*.– The standard of passing the Examination, shall be fifty per cent. of the total marks in each paper. In case of failure, such candidate is required to pass the Examination for those subjects in which he has failed.

**9.** *Special skills*.– The candidate who passes the Examination in first attempt and obtains seventy per cent. or more marks in any subject, shall be deemed to have passed the Examination with special skill and an entry to that effect shall be recorded in his service book.

**10.** *Examination when to be conducted*.– (*i*) The Examination shall be held by the Maharashtra Engineering Training Academy, Nashik once in a year preferably in the month of May or June. The Examination shall be conducted in English language.

(*ii*) The Academy shall declare result of the Examination within the period of forty-five days from date of completion of the Examination. The result declared by the Academy shall be final and delay in announcement of result shall not invalidate the Examination.

**11.** *Conduct in Examination hall*.– The Examination Controlling Officer shall restrict the candidate from appearing for the Examination and prohibit the candidate from appearing for rest of the papers if he find that the candidate is misbehaving in the manner mentioned below, namely:–

(*i*) copying, carrying or referring any document, book, mobile, any electronic gadget or any other material which can be referred for answering the questions;

(*ii*) making conversation with other candidates;

(*iii*) receiving help from other candidate in any matter;

(*iv*) copying the answer paper of any other candidate;

(*v*) tearing the answer sheets;

(*vi*) any other way or manner of behaviour which may amount to malpractices in the Examination.

**12.** The Government Resolution No. Wipadho/2620/ C.R.16 / Ka.17, dated the 31st March 2021, regarding the common policy of Departmental Examination and the changes made by the General Administration Department, from time to time, shall be applicable to this rule.

**Appendix A**

(Rule 7)

Exam pattern for Departmental Examination for the post of Assistant Engineer in the Water Resources Department

| Sr. No. | Subject | Paper Pattern | Total Marks | Duration | Passing Marks |
|---|---|---|---|---|---|
| (1) | General Engineering (Civil/ Mechanical /Electrical). | Multiple Choice Questions-Online Examination | 150 | 90 min | 75 |
| (2) | Elective.- (any one subject from (a) to (e)),- (a) Water Resources Construction and Irrigation Management, (b) Constructions of Roads, Buildings and Bridges, (c) Water Supply and Sanitary Engineering, (d) Use of Machinery, (e) Transmission and Distribution. | Multiple Choice Questions-Online Examination | 150 | 90 min | 75 |
| (3) | Accounts and Administration Rules. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| (4) | Surveying. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| (5) | Drawing. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| | Total Marks | | 600 | | 300 |

**Appendix B**
(Rule 7)

Syllabus for Departmental Examination for the post of Assistant Engineer in the Water Resources Department

| 1. Subject – General Engineering (Civil//Mechanical /Electrical) | | |
|---|---|---|
| Sr. No. | Subject | Syllabus |
| (1) | General Civil Engineering | (i) Construction materials,<br>(ii) Civil constructions, Design, Quality control,<br>(iii) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(iv) Disaster Management,<br>(v) Land Acquisition and Rehabilitation,<br>(vi) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (2) | General Mechanical Engineering | (i) Basic properties, Standard weights and measurements of materials used in mechanical,<br>(ii) Use of various machinery and equipment,<br>(iii) Welding, Soldering and brazing, heat treatment ,<br>(iv) Oil engines and repair and maintenance,<br>(v) Valuation of machinery,<br>(vi) Commercial correspondence,<br>(vii) Electric generators and repairs,<br>(viii) Factory act, 1948 (63 of 1948), Employee's Compensation Act, 1923 (8 of 1923), Rules regarding stores,<br>(ix) Fundamentals of Engineering,<br>(x) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(xi) Disaster Management,<br>(xii) Land Acquisition and Rehabilitation,<br>(xiii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (3) | General Electrical Engineering | (i) Hydro Electric policy of Maharashtra Government,<br>(ii) Power Generation, Transmission and Distribution,<br>(iii)Power Generation Plant - Design, construction and |

| | | |
|---|---|---|
| | | maintenance, repairs,<br>(iv) Electric sub station - Design, construction and maintenance, repairs,<br>(v) Various Electrical Instruments – Use, maintenance and repairs,<br>(vi) Various instruments used in industries and home ,<br>(vii) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(viii) Disaster Management,<br>(ix) Land Acquisition and Rehabilitation,<br>(x) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 2. Subject - Elective | | |
| (a) | Water Resources Construction and Irrigation Management | (i) Survey, design, construction, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions in Water Resources Department,<br>(ii) Irrigation Management Laws and Regulations, water auditing, dam safety, State Water Policy,<br>(iii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of Water Resources Department. |
| (b) | Construction of roads, buildings and bridges | (i) Survey, design, constructions, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions in Public Works Department,<br>(ii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of Public Works Department. |
| (c) | Water Supply and Sanitary Engineering | (i) Survey, design, constructions, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions and machines related to water supply,<br>(ii) Aeration of water, coagulation, filtration, distribution, pump and pumping stations, disinfection of water, management of water treatment plant,<br>(iii) Survey, design, construction, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of structures and machinery |

| | | |
|---|---|---|
| | | related to sewage disposal process ,<br>(iv) Treatment of sewage, Disposal of sewage and effluent, sewage management,<br>(v) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding water supply and sanitary works. |
| (d) | Use of Machinery | (i) Mechanical workshop – Site selection, layout, machinery, work estimates, factory rules, stores and inventory, accounting and verification,<br>(ii) Machinery used for earthworks - selection according to use, utility, maintenance and repair, costing of work done,<br>(iii) Motor vehicles - General administration, selection according to use, utility, maintenance and repairs,<br>(iv) Transport Rules,<br>(v) Different types of railway engines, their maintenance repairs,<br>(vi) Operation, maintenance and repair of stationary plants, pumps,<br>(vii) Other equipment and machinery related to work,<br>(viii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (e) | Transmission and Distribution | (i) Hydro Electric policy of Maharashtra Government,<br>(ii) 22 kV, 110 kV and 220 kV switchyard design, construction, operation and maintenance repairs,<br>(iii) Lift irrigation schemes and pumps - Design, construction and maintenance repairs,<br>(iv) Technical audit of work,<br>(v) Basic principles, rules of transmission and distribution, standard voltage,<br>(vi) Various materials and instruments used for transmission and distribution,<br>(vii) Design, construction and maintenance repair of transmission and distribution works,<br>(viii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |

| 3. Subject - Accounts and Administration Rules | | |
|---|---|---|
| Accounts and Administration Rules | (i) | Maharashtra Public Works Account Code, |
| | (ii) | Maharashtra Public Works Manual, |
| | (iii) | Indian Government Accounts and Audit Rules, |
| | (iv) | Labour Laws, |
| | (v) | Maharashtra Civil Services Rules, |
| | (vi) | Working of stores, Treasury rules and rules related to work of other administrative Departments, |
| | (vii) | Right to Information Act, 2005 (22 of 2005), |
| | (viii) | Maharashtra Public Records Act, 2005 (Mah. IV of 2006), |
| | (ix) | Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties Act, 2005 (Mah. XXI of 2006), |
| | (x) | Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 4. Subject - Surveying | | |
| Surveying | (i) | Project investigation, |
| | (ii) | Surveying instruments , advance instruments of surveying, use and maintenance, |
| | (iii) | Rules of surveying and calculations, |
| | (iv) | Government Resolutions and Circulars issued from time to time regarding surveying, |
| | (v) | Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 5. Subject - Drawing | | |
| Drawing | (i) | Project drawings, preservation of drawings, |
| | (ii) | Various conventional and latest methods of drawing, |
| | (iii) | Drawings of various structures, |
| | (iv) | Government Resolutions and Circulars issued from time to time regarding drawings, |
| | (v) | Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

UDDHAV DHIPHALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ६४(४)] गुरुवार, जुलै ११, २०२४/आषाढ २०, शके १९४६ [पृष्ठे १५, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ११८

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**जलसंपदा विभाग**

मंत्रालय,मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जुलै २०२४

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक परीक्षा-२०२३/(प्र.क्र.२२/२०२३)/आ.(प्रशि).—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, काढलेले आदेश किंवा संलेख हे जेथवर, महाराष्ट्र शासनाच्या, जलसंपदा विभागाच्या अंतर्गत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) व कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदांशी संबंधित असतील तेथवर त्यांचे अंशतः अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) व कनिष्ठ अभियंता (विद्युत), गट - ब ( अराजपत्रित) या पदांचे विनियमन करणारे पुढील विभागीय परीक्षा (कायम करण्यासाठी) नियम करीत आहेतः-

**१.** या नियमांस, जलसंपदा विभागातील, कनिष्ठ अभियंता, विभागीय परीक्षा (कायम करण्यासाठी) नियम, २०२४, असे म्हणावे.

**२.** व्याख्या.- या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "प्रबोधिनी" याचा अर्थ, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक, असा आहे;

(ख) "परिशिष्ट" याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेले परिशिष्ट, असा आहे;

(ग) "परीक्षा" याचा अर्थ, या नियमांनुसार आणि नियम ८ अन्वये तसेच परिशिष्ट "क" व परिशिष्ट " ख" नुसार विहित केलेल्या पाठ्यक्रमानुसार घेतलेली कनिष्ठ अभियंता या पदाकरिता विभागीय परीक्षा, असा आहे;

(घ) "कनिष्ठ अभियंता" याचा अर्थ, जलसंपदा विभागातील, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) व कनिष्ठ अभियंता (विद्युत), गट - ब (अराजपत्रित) या पदांकरिता नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे;

(ङ) "जलसंपदा विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग, असा आहे;

**३.** परीक्षा देण्याकरिता अर्हता.- कनिष्ठ अभियंता, या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, परीक्षा देण्यास पात्र असेल.

**४.** परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता संधीची एकूण संख्या.- (एक) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांमार्फत विभागाने आयोजित केलेली परीक्षा संधी म्हणून गणन्यात येईल.

(दोन) कनिष्ठ अभियंता पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सलग तीन संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(तीन) ज्या व्यक्तीने, हे नियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी, सर्व संधींचा लाभ घेतलेला आहे, त्याला या नियमांखाली, परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि त्यात निष्फळ ठरल्यास या नियमांखाली अशा अपयशाचे परिणाम तो भोगेल.

(चार) ज्या व्यक्तीने, हे नियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी तीनपेक्षा कमी संधींचा लाभ घेतला आहे, त्यांना या नियमांनुसार अशा उर्वरित संधी मिळतील:

परंतु, ती व्यक्ती उक्त परीक्षेस बसण्यास पात्र आहे परंतु, तिने परीक्षा अर्ज सादर केलेला नाही किंवा परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास, ती अशा व्यक्तीची संधी म्हणून गणली जाईल:

परंतु आणखी असे की, जर परीक्षा अर्ज सादर करण्याची प्रक्रिया आधीच पूर्ण झाली असेल आणि अशा व्यक्तीने पदावर रुजू झाल्यानंतर अशी परीक्षा आयोजित केली असेल, तर ती अशा व्यक्तीची संधी म्हणून गणली जाणार नाही.

**५.** परीक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम.- (एक) जर एखादी व्यक्ती विहित संधींमध्ये परीक्षा उत्तीर्ण होऊ शकली नाही तर, त्याची वेतनवाढ रोखली जाईल, तो उक्त पदावर कायम केला जाण्यास देखील पात्र असणार नाही आणि त्या पदावरील त्याची ज्येष्ठता तो गमावेल.

(दोन) अशी रोखलेली वेतनवाढ अशा व्यक्तीला तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून देय होईल किंवा नियम ६ नुसार सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळेल आणि संबंधित व्यक्तीची ज्येष्ठता देखील अशा तारखेपासून निश्चित केली जाईल, अशा कालावधीची वेतन निश्चिती काल्पनिक वेतनवाढीच्या आधारे केली जाईल आणि भविष्यातील सर्व वेतनवाढी कोणतीही वेतनवाढ रोखून धरण्यात आली नव्हती असे समजून त्याला उपार्जित होतील. परंतु, मागील कालावधीतील कोणतीही थकबाकी त्याला अनुज्ञेय असणार नाही.

**६.** परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट.- १ मार्च, २०१८ रोजी किंवा त्यानंतर कनिष्ठ अभियंता पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीला वयाची पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानंतर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली जाईल. जलसंपदा विभागाचे संबंधित अधीक्षक अभियंता अशी सूट देण्यास सक्षम आहेत.

**७.** उत्तीर्ण झाल्याचा दिनांक .- परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या लगतनंतरचा दिवस परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक मानण्यात येईल.

**८.** पाठ्यक्रम.- परीक्षेचा नमुना, पेपरची (प्रश्नपत्रिकांची) संख्या, विषय व मिळवावयाचे किमान पात्रता गुण परिशिष्ट "क" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि परीक्षेचा पाठ्यक्रम परिशिष्ट " ख" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल किंवा राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निदेश देईल त्याप्रमाणे असेल.

**९.** उत्तीर्ण होण्याचे मानक.- परीक्षा उत्तीर्ण होण्याचे मानक प्रत्येक पेपरमध्ये एकूण गुणांच्या पन्नास टक्के असेल. अनुत्तीर्ण झाल्यास, अशा उमेदवारांनी ज्या विषयांत तो अनुत्तीर्ण झाला आहे त्यासाठी परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

**१०.** विशेष प्राविण्य.- जो उमेदवार पहिल्या प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होतो आणि कोणत्याही विषयात सत्तर टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवतो, त्याने विशेष प्राविण्यासह परीक्षा उत्तीर्ण केल्याचे मानले जाईल आणि तशी नोंद त्याच्या सेवा पुस्तकात नोंदविली जाईल.

**११.** परीक्षा केव्हा घेण्यात येईल.- (एक) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी नाशिकद्वारे वर्षातून एकदा, शक्यतो मे किंवा जून महिन्यात परीक्षा घेतली जाईल. परीक्षा इंग्रजी भाषेतून घेतली जाईल.

(दोन) प्रबोधिनी परीक्षा पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत परीक्षेचा निकाल जाहीर करेल. प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल अंतिम असेल आणि निकाल जाहीर करण्यास विलंब झाल्यास, परीक्षा अवैध ठरणार नाही.

**१२.** परीक्षा कक्षातील वर्तन.- उमेदवार खालील नमूद केलेल्या पद्धतीने गैरवर्तन करत असल्याचे आढळून आल्यास, परीक्षा नियंत्रण अधिकारी उमेदवाराला परीक्षेला बसण्यापासून रोखील आणि उमेदवाराला उर्वरित परीक्षेला बसण्यास मनाई करीलः-

(एक) कोणतेही कागदपत्रे, पुस्तक, मोबाईल, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण किंवा इतर कोणतीही सामग्री जी प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी संदर्भित केली जाऊ शकते, त्याची नक्कल करणे, बाळगणे किंवा संदर्भ देणे;

(दोन) इतर उमेदवारांसोबत संभाषण करणे;

(तीन) कोणत्याही बाबतीत इतर उमेदवारांकडून मदत घेणे;

(चार) इतर कोणत्याही उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेची नक्कल करणे;

(पाच) उत्तर पत्रिका फाडणे;

(सहा) इतर कोणताही मार्ग किंवा वर्तनाची पद्धत जी परीक्षेत गैरप्रकार ठरू शकते.

**१३.** विभागीय परीक्षेसंदर्भातील सामायिक धोरण आणि सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी केलेले बदल यासंदर्भातील दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीचा शासन निर्णय क्र. विपधो २६२०/ प्र.क्र. १६/ का.१७ या नियमाला लागू असेल.

**परिशिष्ट क**

**(नियम ८)**

**जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदासाठी विभागीय परीक्षेचे स्वरुप**

| अ.क्र. | विषय | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | एकूण गुण | कालावधी | उत्तीर्णता गुण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत). | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १५० | ९० मिनिटे | ७५ |
| (२) | वैकल्पिक.- ((क) पासून (ङ) पर्यंत कोणताही एक विषय),-<br>(क) जलसंपदा बांधकामे व सिंचन व्यवस्थापन,<br>(ख) रस्ते, इमारती आणि पुलांचे बांधकाम,<br>(ग) पाणी पुरवठा आणि स्वच्छता अभियांत्रिकी,<br>(घ) यंत्रसामग्रीचा वापर,<br>(ङ) पारेषण व वितरण. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १५० | ९० मिनिटे | ७५ |
| (३) | लेखा व प्रशासन नियम. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| (४) | सर्वेक्षण. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| (५) | आरेखन. | बहुपर्यायी प्रश्न-ऑनलाइन परीक्षा | १०० | ६० मिनिटे | ५० |
| | **एकूण गुण** | | **६००** | | **३००** |

## परिशिष्ट ख

## (नियम ८)

## जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदाकरिता विभागीय परीक्षेसाठी पाठ्यक्रम

| १. विषय - सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य/यांत्रिकी/ विद्युत) | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **विषय** | **पाठ्यक्रम** |
| ( १) | सामान्य स्थापत्य अभियांत्रिकी | (एक)बांधकाम साधन सामुग्री,<br>(दोन) स्थापत्य बांधकामे, संकल्पन, गुण नियंत्रण,<br>(तीन) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(चार) आपत्ती व्यवस्थापन,<br>(पाच) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(सहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| ( २) | सामान्य यांत्रिकी अभियांत्रिकी | (एक) यांत्रिकीमध्ये वापरल्या जाणाऱ्या सामग्रीचे मूलभूत गुणधर्म, प्रमाण वजने आणि मापे,<br>(दोन) विविध यंत्रसामग्री आणि उपकरणांचा वापर,<br>(तीन) सांधकाम, डाककाम, झाळणकाम आणि तापन प्रक्रिया,<br>(चार) तेल इंजिन आणि दुरुस्ती व देखभाल,<br>(पाच) यंत्रसामुग्रीचे मुल्यांकन,<br>(सहा) वाणिज्यिक पत्रव्यवहार,<br>(सात) विद्युत जनित्रे व दुरुस्ती,<br>(आठ) कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३), श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८), भांडार शाखेशी निगडित नियम,<br>(नऊ) अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे,<br>(दहा) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(अकरा) आपत्ती व्यवस्थापन,<br>(बारा) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(तेरा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (३) | सामान्य विद्युत अभियांत्रिकी | (एक) महाराष्ट्र शासनाचे जलविद्युत धोरण,<br>(दोन) वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण,<br>(तीन) वीज निर्मिती केंद्र –संकल्पन, संरचना आणि देखभाल दुरुस्ती, |

| | | |
|---|---|---|
| | | (चार) विद्युत उपकेंद्र – संकल्पन, बांधकाम आणि देखभाल दुरुस्ती,<br>(पाच) विविध विद्युत उपकरणे – वापर, देखभाल आणि दुरुस्ती,<br>(सहा) घरगुती व औद्योगिक वापरात येणारी विविध उपकरणे,<br>(सात) बांधकाम व्यवस्थापन, निविदा प्रक्रिया आणि नियम, निविदांचे प्रकार,<br>(आठ) आपत्ती व्यवस्थापन,<br>(नऊ) भूसंपादन आणि पुनर्वसन,<br>(दहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| **२. विषय : वैकल्पिक** | | |
| (क) | जलसंपदा बांधकामे व सिंचन व्यवस्थापन | (एक) जलसंपदा विभागातील विविध बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) सिंचन व्यवस्थापन कायदे आणि नियम, जल लेखांकन, धरण सुरक्षा, राज्याची जलनिती,<br>(तीन) जलसंपदा विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ख) | रस्ते, इमारती व पुलांचे बांधकाम | (एक) सार्वजनिक बांधकाम विभागातील विविध बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ग) | पाणीपुरवठा व स्वच्छता अभियांत्रिकी | (एक) सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामग्री, गुण नियंत्रण आणि पाणी पुरवठ्याशी संबंधित विविध बांधकामे आणि यंत्रांची देखभाल दुरुस्ती,<br>(दोन) पाण्याचे संवातन, किलाटन, निस्यंदन, वितरण, पंप आणि पंपिंग केंद्र, जल निर्जंतुकीकरण, जल शुध्दीकरण केंद्राचे व्यवस्थापन,<br>(तीन) सांडपाणी विल्हेवाट प्रक्रियेशी संबंधित बांधकामांचे सर्वेक्षण, संकल्पन, बांधकामे, बांधकाम पद्धती, बांधकाम सामुग्री, गुणनियंत्रण आणि देखभाल दुरुस्ती,<br>(चार) मलोपचार, मल व मल नि:स्त्राव यांची विल्हेवाट, मलव्यवस्थापन,<br>(पाच) पाणीपुरवठा व स्वच्छताविषयक कामांशी संबंधित वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |

| | | |
|---|---|---|
| (घ) | यंत्रसामग्रीचा वापर | (एक) यांत्रिक कार्यशाळा - जागेची निवड, आराखडा, यंत्रसामग्री, कामाचे अंदाज, कारखाना नियम, भांडार व संग्रह, लेखा व पडताळणी,<br>(दोन) मातीकामासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री - वापरानुसार निवड, उपयोगिता, देखभाल आणि दुरुस्ती, केलेल्या कामाचे परिव्ययांकन<br>(तीन) मोटार वाहने - सामान्य प्रशासन, वापरानुसार निवड, उपयुक्तता, देखभाल व दुरुस्ती,<br>(चार) परिवहन नियम,<br>(पाच) विविध प्रकारचे रेल्वे इंजिन, त्यांची देखभाल दुरुस्ती,<br>(सहा) अचल सयंत्र व पंप यांचा वापर, देखभाल व दुरुस्ती,<br>(सात) कामकाजासंबंधित इतर उपकरणे आणि यंत्रसामग्री,<br>(आठ) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| (ङ) | पारेषण व वितरण | (एक) महाराष्ट्र शासनाचे जलविद्युत धोरण,<br>(दोन) २२ किलो व्होल्ट, ११० किलो व्होल्ट व २२० किलो व्होल्ट, स्विचयार्ड संकल्पन, बांधकाम, कार्य व देखभाल दुरुस्ती,<br>(तीन) उपसा सिंचन योजना आणि पंप —संकल्पन, बांधकाम व देखभाल दुरुस्ती,<br>(चार) कामाचे तांत्रिक लेखापरीक्षण,<br>(पाच) पारेषण व वितरण यांचे मुळ तत्व, नियम व प्रमाण व्होल्टेज,<br>(सहा) पारेषण व वितरणासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य आणि सामग्री,<br>(सात) पारेषण व वितरण कामांचे संकल्पन, बांधकाम व देखभाल दुरुस्ती,<br>(आठ) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |

| **३. विषय- लेखा व प्रशासन नियम** | |
|---|---|
| लेखा व प्रशासन नियम | (एक) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता,<br>(दोन) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका,<br>(तीन) भारत सरकारचे लेखा आणि लेखापरीक्षण नियम,<br>(चार) कामगार कायदे,<br>(पाच) महाराष्ट्र नागरी सेवा नियम,<br>(सहा) भांडार कामकाज, कोषागार नियम आणि इतर प्रशासकीय विभागांशी निगडित कामकाजाचे नियम,<br>(सात) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२), |

| | |
|---|---|
| | (आठ) महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ (२००६ चा महा.४),<br>(नऊ) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महा.२१),<br>(दहा) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय आणि परिपत्रके. |
| **४. विषय - सर्वेक्षण** | |
| सर्वेक्षण | (एक) प्रकल्प सर्वेक्षण,<br>(दोन) सर्वेक्षणाची उपकरणे, सर्वेक्षणाची प्रगत उपकरणे, वापर व देखभाल,<br>(तीन) सर्वेक्षणाचे नियम व परिगणना,<br>(चार) सर्वेक्षणाबाबत वेळोवेळी काढलेले शासन निर्णय व परिपत्रके,<br>(पाच) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |
| **५. विषय - आरेखन** | |
| आरेखन | (एक) प्रकल्प आरेखन, रेखाचित्रांचे जतन,<br>(दोन) रेखाचित्राच्या विविध प्रचलित व अद्ययावत पद्धती,<br>(तीन) विविध संरचनांचे रेखाचित्र,<br>(चार) रेखाचित्राबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके,<br>(पाच) विभागाच्या कामकाजाबाबत वेळोवेळी जारी केलेले शासन निर्णय व परिपत्रके. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**उद्धव दहिफळे,**
शासनाचे उप सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 11th July 2024.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Exam-2023/(C.R.22/2023)/E.(Trg.).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in partial supersession of all the existing rules, orders or instruments issued in this behalf, so far as they are related to the posts of Junior Engineer (Civil), Junior Engineer (Mechanical) and Junior Engineer (Electrical), Group-B, under the Water Resources Department, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules for regulating the Departmental Examination (for confirmation) for the posts of Junior Engineer (Civil), Junior Engineer (Mechanical) and Junior Engineer (Electrical), Group-B (Non-Gazetted), in the Water Resources Department, namely:-

**1.** These rules may be called the Junior Engineers, in the Water Resources Department Departmental Examination (for confirmation) Rules, 2024.

**2.** Definitions.- In these rules, unless the context otherwise requires,-

(*a*) "Academy" means the Maharashtra Engineering Training Academy, Nashik;

(*b*) "Appendix" means the Appendix appended to these rules;

(*c*) "Examination" means the Departmental Examination for the post of Junior Engineer, held in accordance with these rules and as per the syllabus prescribed under rule 8 read with Appendix A and Appendix B;

(*d*) "Junior Engineer" means the persons appointed by nomination to the posts of Junior Engineer (Civil), Junior Engineer (Mechanical) or Junior Engineer (Electrical), Group B (Non-Gazetted), as the case may be, in the Water Resources Department;

(*f*) "Water Resources Department" means the Water Resources Department of the Government of Maharashtra.

**3.** Eligibility to appear for Examination.- The persons appointed by nomination to the post of Junior Engineer, shall be eligible to appear for the Examination.

**4.** Number of opportunities for passing Examination.- (*i*) The Examination conducted by the Department through the Maharashtra Engineering Training Academy, Nashik shall be counted as an opportunity.

(*ii*) A person appointed by nomination to the post of Junior Engineer shall require to pass the Examination in three consecutive opportunities from the date of his appointment.

(*iii*) A person who has availed all the opportunities before the date of publication of these rules in the *Official Gazette*, shall be required to pass the Examination under these rules and he shall bear the consequences for such failure under these rules.

(*iv*) The person who has availed less than three opportunities, before the date of publication of these rules in the *Official Gazette*, shall get such remaining opportunities under these rules:

Provided that, the person is eligible to appear for the said Examination but do not submit the Examination form or remains absent for the Examination, then it shall be counted as an opportunity to such person:

Provided further that, if the process for submission of the Examination form is already completed and such Examination is held after joining the post by the person, then it shall not be counted as an opportunity to such person.

**5.** Consequences of failure to pass Examination.- (*i*) If a person fails to pass the Examination within the prescribed opportunities, his increment shall be withheld, he shall also not be eligible to be confirmed on the said post and he shall lose his seniority on the said post.

(*ii*) The increment so withheld shall become payable to such person with effect from the date on which he passes the Examination or get exemption from passing the said Examination as per rule 6 and also seniority of the concerned person shall be fixed from such date, the pay fixation of such period shall be done on the basis of notional increment and all future increments shall accrue to him as if no increment is withheld but no arrears for the past period shall be admissible.

**6.** Exemption from passing.- A person appointed by nomination to the post of Junior Engineer on or after the 1st March 2018, shall be exempted from passing the Examination after completion of fifty years of his age. The concerned Superintending Engineer of the Water Resources Department is competent to grant such exemption.

**7.** Date of passing.- The day immediately following the next day of the last paper of the Examination, shall be considered as the date of passing of the Examination.

**8.** Syllabus.- Pattern of Examination, number of papers, subjects and minimum qualifying marks to be obtained shall be as specified in Appendix "A" and syllabus of the examination shall be as specified in Appendix "B" or as the State Government may direct by order, from time to time.

**9.** Standard of passing.- The standard of passing the Examination, shall be fifty per cent. of the total marks in each paper. In case of failure, such person is required to pass the Examination for those subjects in which he has failed.

**10.** Special skills.- The candidate who passes the examination in first attempt and obtains seventy per cent. or more marks in any subject, shall be deemed to have passed the Examination with special skill and an entry to that effect shall be recorded in his service book.

**11.** Examination when to be conducted.- (*i*) The Examination shall be held by the Maharashtra Engineering Training Academy, Nashik once in a year preferably in the month of May or June. The Examination shall be conducted in English language.

(*ii*) The Academy shall declare result of the Examination within a period of forty-five days from date of completion of the Examination. The result declared by the Academy shall be final and delay in announcement of result shall not invalidate the Examination.

**12.** Conduct in Examination hall.- The Controlling Officer of Examination shall restrict the candidate from appearing for the Examination and prohibit the candidate from appearing for rest of the papers if he find that the candidate is misbehaving in the manner mentioned below, namely:-

(*i*) copying, carrying or referring any document, book, mobile, any electronic gadget or any other material which can be referred for answering the questions;

(*ii*) making conversation with other candidates;

(*iii*) receiving help from any other candidate in any matter;

(*iv*) copying the answer paper of any other candidate;

(*v*) tearing the answer sheets;

(*vi*) any other way or manner of behaviour which may amount to malpractices in the Examination.

**13.** The Government Resolution No. Wipadho/2620/ C.R.16 / Ka.17, dated the 31st March 2021, regarding the common policy of Departmental Examination and the changes made by the General Administration Department, from time to time, shall be applicable to this rule.

## Appendix A

(Rule 8)

Examination pattern for Departmental Examination for the post of Junior Engineer in the Water Resources Department

| Sr. No. | Subject | Paper Pattern | Total Marks | Duration | Passing Marks |
|---|---|---|---|---|---|
| (1) | General Engineering<br>(Civil/ Mechanical /Electrical). | Multiple Choice Questions-Online Examination | 150 | 90 min | 75 |
| (2) | Elective.-<br>(any one subject from (a) to (e)),-<br><br>(a) Water Resources Construction and Irrigation Management,<br><br>(b) Constructions of Roads, Buildings and Bridges,<br><br>(c) Water Supply and Sanitary Engineering,<br><br>(d) Use of Machinery,<br><br>(e) Transmission and Distribution. | Multiple Choice Questions-Online Examination | 150 | 90 min | 75 |
| (3) | Accounts and Administration Rules. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| (4) | Surveying. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| (5) | Drawing. | Multiple Choice Questions-Online Examination | 100 | 60 min | 50 |
| | Total Marks | | 600 | | 300 |

**Appendix B**
(Rule 8)

Syllabus for Departmental Examination for the post of Junior Engineer in the Water Resources Department

| 1. Subject – General Engineering (Civil//Mechanical /Electrical) | | |
|---|---|---|
| Sr. No. | Subject | Syllabus |
| (1) | General Civil Engineering | (i) Construction materials,<br>(ii) Civil constructions, Design, Quality control,<br>(iii) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(iv) Disaster Management,<br>(v) Land Acquisition and Rehabilitation,<br>(vi) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (2) | General Mechanical Engineering | (i) Basic properties, Standard weights and measurements of materials used in mechanical,<br>(ii) Use of various machinery and equipment,<br>(iii) Welding, Soldering and brazing, heat treatment ,<br>(iv) Oil engines and repair and maintenance,<br>(v) Valuation of machinery,<br>(vi) Commercial correspondence,<br>(vii) Electric generators and repairs,<br>(viii) Factory act, 1948 (63 of 1948), Employee's Compensation Act, 1923 (8 of 1923), Rules regarding stores,<br>(ix) Fundamentals of Engineering,<br>(x) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(xi) Disaster Management,<br>(xii) Land Acquisition and Rehabilitation,<br>(xiii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (3) | General Electrical Engineering | (i) Hydro Electric policy of Maharashtra Government,<br>(ii) Power Generation, Transmission and Distribution,<br>(iii)Power Generation Plant - Design, construction and maintenance, repairs,<br>(iv) Electric sub station - Design, construction and maintenance, |

| | | |
|---|---|---|
| | | repairs,<br>(v) Various Electrical Instruments – Use, maintenance and repairs,<br>(vi) Various instruments used in industries and home ,<br>(vii) Construction management, Tendering procedure and rules, Types of tenders,<br>(viii) Disaster Management,<br>(ix) Land Acquisition and Rehabilitation,<br>(x) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 2. Subject - Elective | | |
| (a) | Water Resources Construction and Irrigation Management | (i) Survey, design, construction, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions in Water Resources Department,<br>(ii) Irrigation Management Laws and Regulations, water auditing, dam safety, State Water Policy,<br>(iii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of Water Resources Department. |
| (b) | Construction of roads, buildings and bridges | (i) Survey, design, constructions, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions in Public Works Department,<br>(ii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of Public Works Department. |
| (c) | Water Supply and Sanitary Engineering | (i) Survey, design, constructions, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of various constructions and machines related to water supply,<br>(ii) Aeration of water, coagulation, filtration, distribution, pump and pumping stations, disinfection of water, management of water treatment plant,<br>(iii) Survey, design, construction, construction methods, construction materials, quality control and maintenance repair of structures and machinery related to sewage disposal process,<br>(iv) Treatment of sewage, Disposal of sewage and |

| | | |
|---|---|---|
| | | effluent, sewage management,<br>(v) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding water supply and sanitary works. |
| (d) | Use of Machinery | (i) Mechanical workshop – Site selection, layout, machinery, work estimates, factory rules, stores and inventory, accounting and verification,<br>(ii) Machinery used for earthworks - selection according to use, utility, maintenance and repair, costing of work done,<br>(iii) Motor vehicles - General administration, selection according to use, utility, maintenance and repairs,<br>(iv) Transport Rules,<br>(v) Different types of railway engines, their maintenance repairs,<br>(vi) Operation, maintenance and repair of stationary plants, pumps,<br>(vii) Other equipment and machinery related to work,<br>(viii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| (e) | Transmission and Distribution | (i) Hydro Electric policy of Maharashtra Government,<br>(ii) 22 kV, 110 kV and 220 kV switchyard design, construction, operation and maintenance repairs,<br>(iii) Lift irrigation schemes and pumps - Design, construction and maintenance repairs,<br>(iv) Technical audit of work,<br>(v) Basic principles, rules of transmission and distribution, standard voltage,<br>(vi) Various materials and instruments used for transmission and distribution,<br>(vii) Design, construction and maintenance repair of transmission and distribution works,<br>(viii) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |

| 3. Subject - Accounts and Administration Rules | |
|---|---|
| Accounts and Administration Rules | (i) Maharashtra Public Works Account Code,<br>(ii) Maharashtra Public Works Manual,<br>(iii) Indian Government Accounts and Audit Rules,<br>(iv) Labour Laws,<br>(v) Maharashtra Civil Services Rules,<br>(vi) Working of stores, Treasury rules and rules related to work of other administrative Departments,<br>(vii) Right to Information Act, 2005 (22 of 2005),<br>(viii) Maharashtra Public Records Act, 2005 (Mah. IV of 2006),<br>(ix) Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay in Discharge of Official Duties Act, 2005 (Mah. XXI of 2006),<br>(x) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 4. Subject - Surveying | |
| Surveying | (i) Project investigation,<br>(ii) Surveying instruments , advance instruments of surveying, use and maintenance,<br>(iii) Rules of surveying and calculations,<br>(iv) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding surveying,<br>(v) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |
| 5. Subject - Drawing | |
| Drawing | (i) Project drawings, preservation of drawings,<br>(ii) Various conventional and latest methods of Drawing,<br>(iii) Drawings of various structures,<br>(iv) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding drawings,<br>(v) Government Resolutions and Circulars issued from time to time regarding functioning of department. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

UDDHAV DHIPHALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**अधीक्षक अभियंता व सहसंचालक**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी**
**जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४**

**संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९** — **ई-मेल :-** pemetansk@gmail.com

**जा.क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/104/२०२४ — **दि. १३/०९/२०२४**

# परिपत्रक

**विषय:-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्गाकरीता - माहे ऑगस्ट २०२४ मध्ये नियोजीत ऑनलाईन व्यावसायिक परीक्षेबाबत.

नियंत्रक अधिकारी यांनी कागदपत्रे व ग्राहयता तपासणे बाबत...

**संदर्भ:-** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (राजपत्रित) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) या संवर्गाच्या व्यावसायीक परीक्षरेसाठी नवीन परीक्षा नियम माहे जुलै २०२४ मध्ये शासन अधिसुचनेद्वारे प्रकाशित करण्यात आलेले आहेत. सदर नवीन परीक्षा नियमानुसार गट-ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा दि. २ सप्टेंबर व ३ सप्टेंबर रोजी आयोजीत करण्यात आली होती. विविध तांत्रिक अडचणी व परीक्षा नियम सुधारण्याबाबतच्या कार्यवाहीमुळे, गट-ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा अडीच वर्षापासून आयोजित न होऊन अनेक अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक बाबी प्रलंबित असणे, ही बाब व आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन सदर परीक्षा लवकरात लवकर घेणे आवश्यक होते. यामुळे परीक्षार्थीनी सादर केलेली कागदपत्रे, ग्राह्यता व इतर बाबी तपासण्यास मर्यादीत कालावधी मिळाला होता.

या परीक्षेसाठी प्रथमच ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. परीक्षेचे अर्ज ऑनलाईन सादर करताना, ऑनलाईन अर्जासोबत खालील बाबी सादर करण्याविषयी परीक्षार्थीना या कार्यालयाच्या संदर्भाकींत परिपत्रकान्व्यवे सुचित करण्यात आलेले होते.

१) नियंत्रक अधिकारी प्रमाणपत्र

२) परीक्षा शुल्क भरण्याची पावती (लागू असल्यास)

३) विषयातील सुट बाबत मागील परीक्षेचा निकाल

४) Disability Certificate (लागू असल्यास)

सर्व परीक्षार्थीनी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी अर्जाची प्रिंट काढून सर्व आवश्यक कागदपत्रासह नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु ऑनलाईन अर्ज मर्यादीत कालावधीत सादर करण्याच्या

आवश्यकतेमुळे काही परीक्षार्थीनी उपरोक्त कागदपत्रे संबंधीत नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर केली नसल्याचे आढळून आले आहेत. तरी, अशा परीक्षार्थीनी उपरोक्त सर्व कागदपत्रे आपापल्या नियंत्रक अधिकारी यांचेकडे सादर करणेविषयी सुचना परीक्षार्थींना यापुर्वीच दिलेल्या आहेत.

त्याच अनुषंगाने सर्व नियंत्रक अधिकारी यांना विनंती आहे की, सदर व्यावसायीक परीक्षेस बसलेल्या आपल्या अधिनस्त अभियंता / कर्मचारी यांनी वरील नमुद केल्याप्रमाणे कागदपत्रं आपल्या कार्यालयास सादर केल्याची तपासणी करावी, तसेच, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावरील परीक्षार्थी यांनी यापूर्वीच स्थापत्य अभियांत्रिकी पदाची अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण आहे याबाबत आवश्यक निकालाची पडताळणीही करावी. उपरोक्त तपासणी व पडताळणीमध्ये परीक्षार्थीनी सादर केलेली माहिती अर्ज व कागदपत्रे, पात्रता निकष, इ. बाबत काही त्रुटी आढळल्यास ई-मेल द्वारे त्वरीत या कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्याचीही विनंती आहे, जेणेकरुन परिक्षेचा निकाल नियोजीत वेळेत जाहीर करता येईल.

**(प्र. मो. बावीस्कर)**
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

प्रत- मास्टर फाईल २०२४.

अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी
जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४

संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९ ई-मेल :- pemetansk@gmail.com

**अतितातडीचे :**

**जा.क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/१११/२०२४ दि. २६/०९/२०२४

प्रति,

सर्व नियंत्रक अधिकारी,
जलसंपदा विभाग / सार्वजनिक बांधकाम विभाग / जलसंधारण विभाग /
जिल्हा परिषद / महानगरपालिका / मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**विषय:-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्गाकरीता दि. २ व ३ सप्टेंबर २०२४ रोजी घेतलेल्या ऑनलाईन व्यावसायिक परीक्षेबाबत.
***नियंत्रक अधिकारी यांनी आपले अधीनस्त असलेल्या परीक्षार्थीची ग्राह्यता तपासणे बाबत.***

**संदर्भ:-** १) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४
२) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. १०४ दि. १३/०९/२०२४

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक तर्फे गट-ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा दि. २ व ३ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजीत करण्यात आली होती.

सदर परीक्षेच्या परीक्षार्थीची माहिती या कार्यालयामार्फत तपासली असता काही परीक्षार्थीनी online form सादर करतांना चूकीची माहिती भरली आहे. यामुळे परीक्षेचा निकाल तयार करण्याच्या कामात व्यत्यय/अडचणी येत आहेत व निकाल जाहीर करण्यास उशीर होत आहे.

या अनुषंगाने विनंती की, संदर्भ क्र. २ च्या पत्राने सूचित केलेप्रमाणे आपले अधिनस्त असलेल्या परीक्षार्थीची ग्राह्यता आपले कार्यालयामार्फत तपासण्यात यावी. तसेच तपासणीचे काम सुलभ व्हावे यासाठी आपल्या अधीनस्त असलेल्या परीक्षार्थीची यादी, नियंत्रक अधिकारी निहाय या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. परीक्षार्थीच्या माहितीत काही त्रूटी आढळल्यास या कार्यालयास वरील दिलेल्या ***ई-मेल*** वर त्वरीत अवगत करणे बाबत आपणास विनंती करण्यात येत आहे, जेणेकरुन परीक्षेचा निकाल वेळेत जाहीर करता येईल.

(प्र. मो. बावीस्कर)
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

सोबत:- १) संदर्भिय पत्रे
२) परीक्षार्थीची यादी (नियंत्रक अधिकारी निहाय)
३) Check List

प्रत- मास्टर फाईल २०२४

कृपया मागे पहा...

# Check List

१) नियंत्रक अधिकारी यांचे प्रमाणपत्र.

२) परीक्षा शुल्क भरल्याची पावती (लागू असल्यास)

3) विषयातील सुट बाबत मागील परीक्षेचे निकाल व त्यानुसार ५५ टक्के चा निकष पुर्ण होत असल्याबाबत आवश्यक कागतपत्रे तपासणे. (संदर्भ : महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. परीक्षा-१०२३/प्र.क्र.१५/आस्था-२, मंत्रालय, मुंबई दिनांक २६ एप्रिल २०२३.)

4) Disability Certificate (लागू असल्यास)

5) परीक्षार्थी हे सदर परीक्षेस (गट-ब संवर्ग,व्यावसायिक परिक्षा) पात्र असल्याबाबत आपापल्या विभागाचे संबंधित शासन निर्णय,परीपत्रक, सेवा नियम इ. बाबींची आपल्या स्तरावरून खात्री करणे.

6) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांनी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गाची परीक्षा (लागू असल्यास) पास केली असल्याचे किंवा इतर आवश्यक निकष पूर्ण केले असल्याबाबत आपापल्या विभागाच्या संबंधित शासन निर्णय,परीपत्रक, सेवा नियम इ. नुसार तपासणे.